दि विदर्भ प्रिमियर को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., गांधीसागर, मुख्य कार्यालय, नागपूर–४४००१८.

# आवंटन पत्र, (ALLOTMENT LETTER)

## मौजा– कळमेश्वर योजने (फेज III) अंतर्गत गाळा आरक्षण

श्री / श्रीमती रणजीत नामदेवराव इंगोले

घरकुल क्र. २९, विदर्भ प्रिमीयर घरकुल

योजना, कळमेश्वर

विषय :– उपरनिर्दिष्ठ कळमेश्वर योजने (फेज III) अंतर्गत गाळयाचे आवंटनाबाबत.

महोदय,

सोसायटीच्या प्रबंध समिती (मॅनेजिंग कमिटी) मिटींग दिनांक २८ सप्टेंबर, २०१३ च्या सभेत विचार होवून खालील वर्णनाच्या गाळयाचे आवंटन आपल्या नावाने / संयुक्त नावाने करण्याचा निर्णय झाला आहे.

गाळा – गाळा क्र. 3 इमारत क्र. B-2 मजला क्र. तळ बांधकाम 515 चौ.फुट (सुपर बिल्ट अप) किंमत रूपये 450001/-

आपण ह्या अगोदर रक्कम जमा करून घरकुलाने आरक्षण केले होते. हयाठिकाणी घरकुल देणे शक्य नसल्यामुळे आपणाशी दिनांक १४–०९–२०१३ रोजी झालेल्या सविस्तर चर्चेनुसार नविन गाळे बांधणी योजनेमध्ये आपणांस समाविष्ठ करण्यात येवून, उपरोक्तप्रमाणे गाळयाचे आवंटन खालील अटी व शर्थीचे अधिन राहून करण्यात येत आहे.

१) किंमत रूपये ४,५०,०००/– प्रति गाळा (अपार्टमेंट)

२) विक्रीपत्राकरिता लागणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, ॲडव्होकेट फि, व्हॅट, सर्व्हीस टॅक्स् तसेच विज व पाणी मिटरकरिता येणारा खर्च व विक्रीपत्र नोंदविण्याकरिता येणारा आवश्यक तो इतर खर्च वेगळा दयावा लागेल.

३) १९ गाळयांचे आवंटन सोडत पध्दतीने केले आहे. त्यानुसार वाटप करण्यात येईल.

४) सोसायटीविरूध्द पोलीसमध्ये देण्यात आलेली तक्रार परत घेतल्यावर व तसे कागदपत्र सादर केल्यावर आवंटन करण्यात येईल.

५) ह्या प्रकरणी समाधानकारक तोडगा काढल्याबद्दल सोसायटीने केलेल्या सहकार्याबाबत वर्तमानपत्रात बातमी आपल्यातर्फे देण्यात येईल.

६) गाळा विकावयाचा असल्यास वर निर्दिष्ठ किंमतीच्या २५% रक्कम भरून ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागेल.

७) चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे गाळयाचे किंमतीपैकी रू. १ लाख आपण सोसायटीत हे पत्र मिळाल्यापासून १ महिन्यात जमा करावे.